नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०९/२०१८

(श्रीमती रत्नप्रभा रेवाडकर – वादी वि. श्री. प्रकाश दाभोलकर वगैरे –प्रतिवादी)

**:– नि. ६० खालील आदेश –:**

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं. १अ श्रीमती लक्ष्मी प्रकाश दाभोलकर या दिनांक २६ /५/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांचे अर्जात नमुद प्रतिवादी नं.१ब हिच कायदेशीर वारस आहे. त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत . त्यामुळे दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन वादी यांनी उशीराने अर्ज दाखल केलेला असून सदरील वारस मुदतीत दाखल केलेले नाहीत तरी खर्चासहीत अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा, हक्कप्रस्थापना व दावा मिळकतींचे धडेवाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे . प्रतिवादी नं.१अ या मयत झाल्याने त्यांचे वारस म्हणून अर्जात नमुद प्रतिवादी नं १ब हे कायदेशीर प्रतिनिधी आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *''दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते.''*

४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. १अ श्रीमती लक्ष्मी प्रकाश दाभोलकर या दिनांक २६/५/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत . प्रस्तुतचा दावा, हक्कप्रस्थापना व दावा मिळकतींचे धडेवाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला असल्याने प्रतिवादी नं.१अ चे वारसांना देखील त्या मिळकतीमध्ये हक्क प्राप्त होतो. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं.१अ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब नि. ५८ कडील अर्जावरील आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. तसेच

प्रतिवादी नं.१अ विरुध्द 'दावा उपशमित' झालेबाबतचा आदेश नि. ५९ कडील आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ६० कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी नं.१अ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2023.02.14 11:08:04 +0530

दिनांक– १३/०२/२०२३

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.